माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /२५५/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संजयकुमार गवळी | प्रशासन अधिकारी पुणे महानगरपालिका | उप आयुक्त (दक्षता विभाग ) पुणे महानगरपालिका |

### (सुनावणी दिनांक- ०२.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.१४.०१.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये मागणी केलेली माहिती दिली नाही, अपिल आदेश मान्य नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०७.११.२०२४ | १) मनपा आयुक्त यांचेकडे सर्व्हे नं ४७/३/१, कल्पतरू सोसायटी, चंदननगर खराडी, येथील विविध तक्रारी skgavali७@gmail.com या ईमेलवरून केल्या गेल्या, तरी संबंधित विभाग नियमानुसार कार्यवाही केली असल्याची खातरजमा आयुक्त कार्यालय यांनी केली असल्यास सविस्तर माहिती मिळावी. आयुक्त कार्यालय येथे तक्रारींचे व्यवस्थापन कार्यपद्धती उधृत करणारी माहिती २) skgavali७@gmail.com यावरून माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री कार्यालय येथे तक्रारी केल्या ज्या पुढे नगरविकास विभाग मार्फत आयुक्त कार्यालय यांच्याकडे फॉरवर्ड झाल्या. सदर तक्रारींवर आयुक्त कार्यालय यांनी त्या त्या विभागास पाठविल्यानंतर त्यावर उचित कारवाई झाली कि नाही किंवा परस्पर बंद केले याचे नियंत्रण असेल तर त्या प्रत्येक ई-मेल वर केलेल्या कार्यवाहीची माहिती व नियंत्रण प्रक्रियेतील पडताळणी ची माहिती तसेच त्यासोबत आयुक्त कार्यालयाकडून संबंधित विभागांना जे निर्देश झाले त्याची माहिती.३) सबळ पुरावे देऊनही संबंधित विभागाने दखल न घेतल्याने gavali७@gmail.com यावरून सदर प्रकरणाचा अनेकदा ई-मेल फॉरवर्ड करून आयुक्त कार्यालय कडे पाठपुरावा केला तर यांवर आयुक्त कार्यालयानी ई-मेल त्या विभागाला फॉरवर्ड करणे पलीकडे |

| | |
|---|---|
| | इतर जी कार्यवाही केली त्याची माहिती. पाठपुरावा केलेल्या तक्रारीवर संबंधित विभाग यांचेकडून स्पष्टीकरण घेतले असेल तर ती माहिती नसेल तर त्यामागील आयुक्त कार्यालय यांची अधिकृत भूमिका देणारी माहिती. ४) पुरावा देऊनही जर तक्रार दडपली जात असेल तर आयुक्त कार्यालय जी कार्यवाही करते त्याची माहिती मागणी असे. skgavali७@gmail.com या वरून ज्या तक्रारी वर संबंधित विभाग कारवाई करित नसल्याचे कळविण्यात आले त्यावर आयुक्त कार्यालय यांनी जी कारवाई केली त्याची माहिती दि. ०१.०१.२०२३ ते ०१.११.२०२४ या कालावधीतील |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, "कल्पतरु सोसायटी बाबत आयुक्त कार्यालयाला जे ईमेल केले ते विभागाला फॉरवर्ड झाले त्या ईमेल संदर्भात कार्यवाही झालेली नाही. मी केलेल्या तक्रारीवर आयुक्त कार्यालयाने कार्यवाही केली नाही. अंदाजे २०० तक्रारी असतील अर्धवट माहिती दिली आहे." त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " संबंधित विभागाला माहिती अर्ज वर्ग केला होता त्यांनी उत्तर दिले आहे."

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.१२.२०२४ च्या पत्राने ४ मुद्यांवर उत्तर / माहिती दिल्याचे दिसुन येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०१.२०२५ च्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय यांनी अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत बांधकाम विभाग, कर आकारणी व कर संकलन विभाग यांचेकडे केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित खाते प्रमुखांना कळवावे असे आदेश देऊन अपिल निकाली काढल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांनी दि. ०९.०१.२०२५ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता झोन क्र. १ ते ७ शहर अभियंता कार्यालय तसेच कर आकरणी व कर संकलन विभागा यांना प्रथम अपिल आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत कळविल्याचे दिसून येते.

प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (दक्षता कार्यालय) महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे मनपा यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने प्रथम अपिलातील आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत वस्तुनिष्ठ माहिती/ उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त करून घेऊन कलम ७(६) नुसार शीघ्र डाकेने विनामुल्य उपलब्ध करून द्यावे.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ /२५५/२०२५/पुणे 4335/2025 दिनांक - 23/9/2025.

रामाआ-पुणे/२०२५/NSB